Literacy for a Billion

Movie: Ranpakhare
Year:

Song: Kiti Aale Kiti Gele Fida Jhale
Lyricist:

किती आलं किती गेलं
फिदा झालं उल्लू झालं
किती आलं किती गेलं
फिदा झालं उल्लू झालं
लागल्यात लई झुरणी
लागल्यात लई झुरणी
मला म्हणत्यात मनहरणी
हो मला म्हणत्यात मनहरणी
किती आलं किती गेलं
फिदा झाल उल्लू झालं
किती आलं किती गेलं
फिदा झाल उल्लू झालं
लागल्यात लई झुरणी
मला म्हणत्यात मनहरणी
हो मला म्हणत्यात मनहरणी

उभार बांधा गोरा पिवळा
उभार बांधा गोरा पिवळा
जसा शाळूचा हुरडा कवळा
जसा शाळूचा हुरडा कवळा
पदर ढळला न् वाऱ्याला कळला
पदर ढळला न् वाऱ्याला कळला
त्याचीच ही करणी
मला म्हणत्यात मनहरणी
मनहरणी मनहरणी मनहरणी
मला म्हणत्यात मनहरणी

टपोरं डोळं मुखडा तिरका
टपोरं डोळं मुखडा तिरका
कसा मारू मी लाडीक मुरका
कसा मारू मी लाडीक मुरका
कमर कटीवर झुंबर हलतंय
कमर कटीवर झुंबर हलतंय
वयानं मी तरणी
मला म्हणत्यात मनहरणी
मनहरणी मनहरणी मनहरणी
मला म्हणत्यात मनहरणी

उभी ज्वानीच्या रानामंदी
उभी ज्वानीच्या रानामंदी
वारं शिरलंय कानामंदी
वारं शिरलंय कानामंदी
दबा धरून हयो मदन बसला
दबा धरून हयो मदन बसला
नवतीच्या कुरणी
मला म्हणत्यात मनहरणी
हो मला म्हणत्यात मनहरणी
किती आलं किती गेलं
फिदा झाल उल्लू झालं
लागल्यात लई झुरणी
मला म्हणत्यात मनहरणी
हो मला म्हणत्यात मनहरणी

Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.

PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.